।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229242
Fax : (02462) 229574

ACADEMIC (APPROVAL) SECTION

Website : srtmun.ac.in
E-mail : approvalsrtmun@gmail.com


## सुधारित परिपत्रक

संदर्भ : १) शैक्षणिक/मान्यता/कॅस/०२/२०२०—२१/१६५७, दिनांक ११/१२/२०२०
२) शैक्षणिक/मान्यता/कॅस/०२/२०२०—२१/२५५९, दिनांक २७/०२/२०२१
३) शैक्षणिक/मान्यता/कॅस/०२/२०२१—२२/३६८३, दिनांक ११/०६/२०२१

प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र.०३ अन्वये दिनांक १५ जून, २०२१ पर्यंत कॅसचे प्रस्ताव स्विकारणेबाबत कळविले होते. परंतु प्रस्तुत विद्यापीठ परिक्षेत्रातील कांही जिल्हयात अंशत: लॉकडाऊन चालू असल्यामुळे कॅसचे प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदत वाढवून देण्यात येत आहे.

प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांचे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमानुसार Stage I to II (Academic Level –11, AGP-7000) व Stage II to III (Academic Level–12, AGP-8000) करीता सेवांतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme-CAS) अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नतीकरीता खालील जिल्हानिहाय केंद्रांवरती दिनांक ३० जून २०२१ पर्यंत पात्र होणारे सहाय्यक प्राध्यापकांचे प्रस्ताव जिल्हानिहाय केंद्रावरती **दिनांक ३०/०६/२०२१** पर्यंत सादर करावीत.

**त्यानुसार खालील जिल्हानिहाय केंद्रानी दिनांक ३०/०६/२०२१ पर्यंत कॅसचे प्रस्ताव स्विकारून तातडीने कॅस प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने कॅस कॅम्पचे आयोजनाची तारीख निश्चित करून सर्व संबंधितांना कळवावे.**

**जिल्हानिहाय कॅस कॅम्प — २०२१**

| अनु.क्र. | जिल्हा | केंद्राचे नांव |
|---|---|---|
| १ | **नांदेड** | प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड. |
| २ | **परभणी व हिंगोली** | तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव जि. हिंगोली. |
| ३ | **लातूर** | शिवाजी महाविद्यालय, रेणापूर जि. लातूर. |

सर्व संलग्नीत महाविद्यालयातील पात्र शिक्षकांचे स्थाननिश्चिती/पदोन्नतीचे प्रस्ताव जिल्हा निहाय केंद्रावर सादर करण्यापूर्वी, संबंधीत महाविद्यालयांनी कार्यरत शिक्षकांना UGC Regulation 2018 प्रमाणे विविध स्तरावरील पात्रतेचे निकष पूर्ण करणा—या विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षकांनी स्थाननिश्चिती (कॅस) चे प्रस्ताव महाविद्यालयातील IQAC कक्षाकडून योग्य ती छाननी/तपासणी करून पात्र असल्याचा स्वतंत्र अहवाल प्राचार्यांकडे द्यावा. प्राचार्यांनी सदरील अहवालाची प्रत, महाविद्यालयाच्या कव्हरींग लेटरसह प्रस्तावाच्या चार प्रती जिल्हा निहाय केंद्रावरती सादर कराव्यात.

मागे पहा...२..

तसेच विद्यापीठ अनुदान आयोग विनियमानुसार CAS अंतर्गत पात्र शिक्षकांचे पदोन्नती/स्थाननिश्चितीचे प्रस्ताव संबंधीत जिल्हा केंद्रावरती सादर करावेत. सदरील प्रस्तावाची छाननी समितीने (Screening Committee) सकारात्मक शिफारस केल्यानंतर चार प्रस्तावापैकी एक प्रस्ताव विद्यापीठाकडे, एक मा.शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) नांदेड विभाग, नांदेड यांना व दोन प्रस्ताव संबंधीत महाविद्यालयास परत करावेत.

'ज्ञानतीर्थ' विष्णुपुरी, नांदेड. §
जा.क्र.शैक्ष/मान्यता/कॅस/०२/२०२१–२२/3699. §
दिनांक : १२/०६/२०२१ §
§

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:

१) मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्राचार्य, प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड.
३) मा.प्राचार्य, तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव जि. हिंगोली.
४) मा.प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर जि. लातूर.
५) मा.शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण सहसंचालनालय, नांदेड विभाग, नांदेड.
६) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.